MHSI04-000139-2019

<u>नियमित दिवाणी दावा क्र. २४ सन २०१९</u>

<u>निशाणी ४९ खालील आदेश</u>

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

०२. प्रतिवादी क्र. २ व १२ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'कैफियत नाही' असा आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, मुदतीत कैफियत दाखल न केल्यामुळे मे. कोर्टाने 'कैफियत नाही' असा आदेश केला आहे. दाव्याचेकामी कैफियत देण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रे जमविण्यात बराचसा वेळ गेल्याने त्यांना या दाव्याचेकामी आपली कैफियत मुदतीत दाखल करता आली नव्हती. प्रतिवादी क्र. २ व १२ यांना दाव्याचे कामी कैफियत देण्याची संधी न दिल्यास त्यांना मिळणाऱ्या न्यायास मुकावे लागणार आहे. परिणामी प्रतिवादी यांना न्यायाची अनेक प्रकरणे दाखल करावी लागून त्यांना शारिरीक व मानसिक त्रासास सामोरे जावे लागून त्यांचे कधीही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणारे आहे. सबब, प्रतिवादी क्र. २ व १२ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन तसेच त्यांचेविरुध्द झालेला 'कैफियत नाही' असा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत दाखल करुन घेण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०४. वादीनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केलेला आहे. त्यांनी अर्ज जास्तीत जास्त खर्च आकारुन मंजूर करण्यात यावा असे म्हणणे दिले आहे.

०५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. २ व १२

यांना उचितरित्या दावा समन्सची बजावणी होवून ते दि.०५/०४/२०२२ रोजी आपल्या विधिज्ञांमार्फत याकामी हजर झाले आहेत. त्यानंतर त्यांनी कैफियत देणेकामी मुदत मागून घेतली आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ अन्वये प्रतिवादी यांस उचित संधी देवून देखील त्यांनी विहीत मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकती संदर्भात आवश्यक माहिती व कागदपत्रे जमविण्यात बराच वेळ गेल्याने त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही असे कारण प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केले आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत दाव्यामध्ये आपली कैफियत मुदतीत दिलेली नाही हे स्पष्ट होते. असे असले तरी न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींना दाव्यामध्ये आपली लेखी कैफियत दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे योग्य होईल. न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीस आपली कैफियत मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरले. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्याने वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही या निर्णयाप्रत मी आलो आहे. असे असले तरी प्रतिवादी यांची प्रस्तुतची कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबामुळे न्यायालयाचा त्याच बरोबर वादीचा बहूमुल्य वेळ वाया गेलेला आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रतिवादी यांच्यावर उचित खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. २ व १२ यांचा प्रस्तुतचा अर्ज रु.२००/- इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ व १२ यांनी खर्च रक्कम रु.२००/- वादी यास अदा करावी, त्यानंतर त्यांची कैफियत दाखल करुन घेणेत येईल.

PAWAN RAMBHAU DHORE
Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2023.01.03 17:43:43 +0530

कुडाळ.
दिनांक : ०३/०१/२०२३

(पी. आर. ढोरे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
कुडाळ.